महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /२०२१/६० दिनांक:- 07 JAN 2022

प्रति,
प्राचार्य /संचालक,
सोबत जोडलेल्या यादीतील संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडिबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या योजनांतर्गत संस्था स्तरावर प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्ती अर्जांवर कार्यवाही करण्याबाबत......

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता महाडिबीटी पोर्टलवरील, तंत्रशिक्षण संचालनालयांमार्फत राबविण्यात येत असलेल्या शिष्यवृत्ती योजना दि. ०३/१२/२०२० पासून सुरु झालेली असुन लॉगीनमध्ये प्राप्त होणारे पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित न ठेवता वेळेमुदतीत मंजुरीकरिता या कार्यालयास पाठविण्यांबाबत आपणांस या कार्यालयामार्फत पत्राव्दारे तसेच व्हॉटसअप ग्रुपव्दारे वारंवार कळविण्यांत आलेले आहे. परंतु महाडिबीटी डॅशबोर्डनुसार यादीतील संस्थांच्या लॉगीन मध्ये अद्याप पर्यंत शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. याबाबत संचालनालयाकडून या कार्यालयास विचारणा होत आहे.

तरी याव्दारे यादीतील संस्थांना पुनःश्च सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील आपल्या लॉगीन ला प्रलंबित असलेल्या अर्जाची त्रुटीची पुर्तता करून दि. ०९/०१/२०२२ पर्यंत शिष्यवृत्तीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूरीस्तव ऑनलाईनरित्या सादर करण्यात यावे.

तसेच आपणास असे कळविण्यात येते की, आपल्या लॉगीन मध्ये प्रलंबित असलेल्या अर्जातील त्रुटीची पुर्तता विहीतमुदतीत होत नसल्यास लॉगीन मध्ये सदर अर्ज प्रलंबित न ठेवता, अर्ज थेट नामंजूर (Reject)करावे. तसेच त्रुटी असलेले अर्ज पाठविण्यात येवू नये. याची दक्षता घेण्यात यावी. **आपल्या लॉगीन ला शै. वर्ष २०२०-२१ अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यास, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर केल्या जाणार नाही. याची प्राचार्यांनी नोंद घ्यावी.**

सहपत्र :- यादी संलग्न

(डॉ. मनोज भा. डायगव्हाणे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

प्रत:- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय ,म.रा.मुंबई (कार्यासन क्र. १८) यांना माहितीकरिता मानार्थ सादर.